मुलाखत क्र. ५

# संवादातून नेतृत्वाकडे

**मनुष्याच्या सहजीवनात संवाद हेच प्रथम दायित्व असते. नात्यांमध्ये, समाजात आणि सार्वजनिक जीवनात संवाद जिवंत असेल, तर नेतृत्वाची दिशा आपोआपच आकार घेत जाते. आपल्या सुदृढ आणि कणखर संवादाच्या जोरावर कौटुंबिक, संघटनात्मक आणि राजकीय स्तरावर स्वत:ला सिद्ध करणारे नाव म्हणजे नांदेडचे प्रसिद्ध बालरोग तज्ज्ञ (MBBS, MD) तथा विद्यमान खासदार डॉ. अजित गोपछडे. बालकांच्या नाजूक आरोग्यापासून ते राष्ट्राच्या व्यापक आरोग्यविषयक धोरणांपर्यंत त्यांच्या कार्याचे पट अनेक रंगांनी उजळलेले आहेत. आज संसदेतील स्थायी समितीवर कार्यरत राहून देशाच्या आरोग्यासाठी दूरदृष्टीची बीजे ते पेरत आहेत. ICMR, AIIMS (नागपूर आणि मंगलगिरी), PCPNDT अशा देशातील सर्वोच्च संस्थांच्या संचालक पदाची धुरा सांभाळणाऱ्या; देशाच्या सर्वोच्च सभागृहात आणि रुग्णांच्या संवेदनशील जगात एकाच वेळी वावर असलेल्या, बहुआयामी व्यक्तिमत्त्वासोबत केलेला हा नेतृत्व सुसंवाद..**

## डॉ. अजित गोपछडे



**सक्रिय राजकारणात येण्यापूर्वी देखील, एक कुशल ''बालरोग तज्ज्ञ'' म्हणून जिल्हाभरात आपला नावलौकिक होता. राजकारणात प्रवेश करण्याचा निर्णय नेमका कशामुळे सुचला ?**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा स्वयंसेवक म्हणून एम.बी.बी.एस. चे शिक्षण घेत असताना संघाच्या विविध सेवा कार्यांशी माझा जवळून संबंध आला. १९८७ पासून संघाच्या माध्यमातून सेवावृत्ती, देशभक्ती आणि समाजासाठी काही देण्याची भावना माझ्यात रुजली. त्या काळात विद्यार्थी दशेत शिक्षण, सामाजिक कार्य आणि विविध जबाबदाऱ्या पार पाडण्याची संधी मिळाली. रामजन्मभूमी आंदोलन, रामपादुका पूजन, गंगा पूजन, शिला पूजन अशा अनेक कार्यक्रमांत सक्रिय सहभाग घेतला. सामाजिक समरसतेच्या दृष्टीने बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठात भ. गौतम बुद्धांच्या प्रदर्शनीचे आयोजन करण्याची संधीही मिळाली.

संघविचारातून उभ्या राहिलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठान व हेडगेवार रुग्णालयाच्या स्थापनेचा मी साक्षीदार होतो. संघ म्हणजे समाज आणि समाजासाठी काही देणे लागते ही शिकवण या सेवा कार्यातून मिळाली. रामजन्मभूमी आंदोलनात कारसेवक व गटप्रमुख म्हणून सहभागी होण्याची संधी मिळाली. त्या वेळी घडलेल्या घटनांचा लाखो स्वयंसेवकांप्रमाणे मी ही साक्षीदार आहे. प्रभू रामचंद्रांच्या भक्तीने भारलेला तो प्रचंड जनसागर (दहा ते पंधरा लाख लोक) मी डोळ्यांनी पाहिला. त्या अनुभवांनी अंतर्मुख होऊन तेथूनच मला सामाजिक क्षेत्रात अधिक वेळ देऊन कार्य करण्याची प्रेरणा मिळाली.

**डॉक्टर म्हणून लोकांच्या भावनांशी जवळीक असते; ह्या संवेदनशीलतेची राजकारणात आपल्याला कशी मदत झाली ?**

डॉक्टर म्हणून काम करताना समाजातील संवेदनशीलता, दुःख आणि माणसांचे खरे प्रश्न जवळून पाहण्याची संधी मिळाली.
एम.बी.बी.एस. नंतर संघ प्रचारक म्हणून खेड्यापाड्यांत फिरताना गोरगरीब शेतकरी, कष्टकरी लोकांशी थेट संपर्क झाला. संघाच्या संस्कारातून ''माणूस घडवणे'' हेच खरे शिक्षण आहे, याची मला जाणीव झाली. संघकार्य हे राष्ट्रकार्य आहे त्या सेवेसाठी दिलेली वर्षे माझ्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाची ठरली.

वैद्यकीय सेवेत असताना दररोजचा प्रत्येक रुग्ण मला काहीतरी नवीन शिकवून जायचा. अनेक रुग्णांच्या दुःखावर फुंकर घालता आली, पैसे नसतानाही उपचार करता आले, तेव्हा मिळणारा समाधानाचा आनंद अवर्णनीय होता. या अनुभवांनी समाजातील वेदना अधिक तीव्रतेने जाणवू लागल्या आणि सामाजिक राजकीय क्षेत्रात काहीतरी करण्याची प्रेरणा मिळाली.

प्रचारक जीवनातही वैद्यकीय सेवा अखंड सुरू ठेवली. त्यानंतर स्वतःचा वैद्यकीय व्यवसाय करताना आकाशवाणीवरून आरोग्यप्रबोधन, खेड्यापाड्यांत मोफत आरोग्य शिबिरे, गोरगरिबांसाठी हेल्पलाईनसारखी टीम उभी केली. आयुर्वेद, होमिओपॅथी, निसर्गोपचार, योग आणि आधुनिक वैद्यक यांचा समन्वय साधत सर्वांगीण उपचारांचा दृष्टिकोन विकसित झाला. या सगळ्या प्रवासातून व्यक्ती-व्यक्ती सोबत संवाद कसा साधायचा, संवेदनशीलपणे कसे वागायचे हे शिकता आले. त्याच अनुभवांच्या बळावर आज सर्वसामान्य कुटुंबातून आलेला माणूस देशसेवेसाठी लोक-प्रतिनिधी म्हणून उभा राहू शकलो.

**चिकित्सक दृष्टीने समस्यांकडे पाहणे आणि राजकीय दृष्टीने पाहणे, यातला फरक आपल्याला कसा वाटतो?**

चिकित्सक दृष्टिकोन आणि राजकीय दृष्टिकोन हे मूलतः वेगवेगळ्या क्षेत्रांतले आहेत. दोन्ही एकाच तराजूत तोलता येत नाहीत. राजकीय क्षेत्र अनेकदा कोलांट-उड्या मारण्यासारखे असते; पण आयुष्यात मी नेहमीच एका विचाराशी प्रामाणिक राहिलो.

चिकित्सक दृष्टिकोन मात्र प्रामाणिकपणा, संवेदनशीलता आणि अभ्यासपूर्ण विचारांवर आधारलेला असतो. रुग्णाचे निदान, उपचार, जगभरातील विविध उपचारपद्धती, सतत येणाऱ्या नव्या व प्रगत उपचार संकल्पना या सर्वांचा सर्वांगीण अभ्यास केल्याशिवाय चांगला वैद्यकीय चिकित्सक होता येत नाही. आज वैद्यकीय क्षेत्र झपाट्याने बदलत आहे; नवे संशोधन, नवे तंत्रज्ञान स्वीकारले नाही, तर आपण मागे पडतो.

राजकारणातही नवनव्या संकल्पना येत आहेत. जग अतिशय गतिमान झाले आहे. मात्र दोन्ही क्षेत्रांत एक गोष्ट समान आहे, ती म्हणजे समाजाबद्दलची भूमिका. ''या समाजाचे मला काय देणे लागते'' ही भावना जर वैद्यकीय आणि राजकीय क्षेत्रात ठेवल्यास तो माणूस खऱ्या अर्थाने यशस्वी होतो. वैद्यकीय क्षेत्रात जशी प्रामाणिकता आवश्यक आहे, तशीच राजकारणातही आवश्यक आहे.

भविष्यात युद्धाचे स्वरूप बदलणार आहे. जमिनीवरचे किंवा आकाशातील युद्ध नव्हे, तर जैविक आणि विषाणूजन्य युद्धे लढली जातील. त्यासाठी वैद्यकीय क्षेत्राने अभ्यास, संशोधन आणि नेतृत्व करणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे नव्या पिढीने आयुर्वेद असो वा आधुनिक वैद्यक, सातत्याने अभ्यास व संशोधन करणे गरजेचे आहे. जशी चिकित्सा प्रामाणिक असते, तशीच राजकारणातही जनसेवा प्रामाणिकपणा, सातत्याने जनतेत राहणे आणि जनतेचे प्रश्न घरच्या प्रश्नांसारखे सोडवणे ही दोन सूत्रे जो पाळेल, त्याच्यासाठी भविष्यात निश्चितच सूर्योदय होईल.

**जनता आपल्याकडे खूप प्रश्न घेऊन येते, तेव्हा प्रत्येक प्रश्न लगेचच सुटणारे असतीलच असे नाही, अशावेळी त्या लोकांना आपल्या संवाद कौशल्यातून कसे समाधानी करता ?**

अशावेळी सर्वात महत्त्वाचे कौशल्य म्हणजे प्रामाणिक संवाद. तेच मी करतो. आज जनता फक्त ''कृतिशील आमदार खासदार'' पाहू इच्छिते. फक्त बघतो-करतो अशी आश्वासने मी देत नाही. होणार नसेल तर स्पष्ट ''होणार नाही'' असे सांगण्याची हिंमत मी ठेवलेली आहे. त्यामुळेच जनतेचा माझ्यावरील विश्वास टिकून आहे. संवाद कौशल्य म्हणजे लाडी लबाडी नव्हे. दिलेले आश्वासन पूर्ण करावेच लागते; जे आपल्या क्षमतेबाहेर आहे त्याचे आश्वासन देऊ नये. जनता दरबार फक्त कार्यालयात नव्हे, तर गरज पडल्यास जनतेच्या दारात जाऊन घ्यावा; पण काम न करता आश्वासन देणाऱ्या राजकारणाला पुढे स्कोप राहणार नाही. नुसते बोलणे नव्हे, तर प्रत्यक्ष काम हीच खरी संवादकला आहे. अन्यथा जनता लगेच ओळखते की हा प्रतिनिधी थापाड्या आहे. म्हणूनच सातत्याने काम करणे, प्रश्न सोडवणे आणि जनतेला समाधान देणे, अशाच राजकारणाचे मी समर्थन करतो.

**मणिपूर सारख्या अतिसंवेदनशील भागात नीडरपणे व प्रत्यक्ष जमिनीवर काम करून, तेथील लोकांच्या मानसिकतेमध्ये सकारात्मक बदल घडवून आणण्याचे, अतिशय अवघड**

**काम आपण केलेले आहे. दुर्दम्य परिस्थितीतील जनभावनेला हाताळण्यासाठी पराकोटीचे संवाद कौशल्य लागते. याबाबतीत आपले काही अनुभव सांगाल का ?**

मी एवढा मोठा माणूस नाही. मात्र संघाच्या माध्यमातून त्या दुर्गम भागात वर्षानुवर्षे शाळा, वैद्यकीय सेवा, विविध प्रकारची सेवा कार्ये आणि संघटन उभे राहिले; त्याच परंपरेत माझी नेमणूक झाली. गेल्या दोन वर्षांत मी तेथील लोकांसोबत राहिलो, त्यांची भाषा शिकली, त्यांच्या घरात मुक्काम केला, हॉटेलऐवजी कार्यकर्त्यांच्या व शेतकऱ्यांच्या घरी राहून त्यांचे जीवन समजून घेतले. खासदार म्हणून नव्हे, तर कुटुंबातील सदस्य म्हणून त्यांच्यासोबत सुख दुःख वाटले. या प्रवासात लक्षात आले की मणिपूरची जनता अत्यंत प्रामाणिक, देशभक्त आणि अपेक्षांनी भरलेली आहे. महिलाही कणखर, मेहनती आणि मनाने चांगल्या आहेत. नैसर्गिक, सेंद्रिय आहारामुळे त्यांचे आरोग्य उत्तम आहे.

पूर्वीच्या राजकारण्यांनी जाती-जमातींचे राजकारण करून पहाडी व मैदानी भागांत संघर्ष पेटवला; त्या पापाचे परिणाम मणिपूरला भोगावे लागले. आम्ही त्या संकटाचे संधीमध्ये रूपांतर करण्याचा प्रयत्न केला. हजारो कार्यकर्ते तिथे कार्यरत आहेत; मी त्यातला फक्त एक छोटासा खारीचा वाटा उचलला आहे. आज वातावरण मोठ्या प्रमाणात सुधारले आहे. पुढील काळात मणिपूरच्या विकासात नरेंद्र मोदी सरकार आणि संघटनांचे समर्पित कार्यकर्ते निर्णायक भूमिका बजावतील, याचा मला पूर्ण विश्वास आहे.

**आपण ज्या क्षेत्रात काम करता, तिथे प्रचंड बिझी असता. तेव्हा आपण कुटुंबासाठी आणि स्वतःसाठी वेळेचे व्यवस्थापन कसे करता ?**



संघटन आणि राजकारणाच्या कामामुळे वेळ अत्यंत मर्यादित मिळतो. आज माझे कुटुंब केवळ घरापुरते राहिलेले नाही; समाज आणि देश हेच माझे विस्तारित कुटुंब झाले आहे. देशासाठी काम करताना कुटुंबासाठी वेळ कमी मिळतो, मित्र-परिवारालाही फारसा वेळ देता येत नाही. सातत्याने प्रवास, बैठका, संसद अधिवेशने आणि निवडणुका यामुळे अनेकदा आई-वडील आणि घरच्या मंडळींची भेटही होत नाही.

तरीही घरच्यांनी हे पूर्णपणे समजून घेतले आहे. देश सेवेसाठी आपण निघालो आहोत, ही जाणीव त्यांच्या मनात आहे. त्यांच्या समजुतीमुळे, पाठिंब्यामुळे आणि त्यागामुळेच मी माझ्या जबाबदाऱ्या पार पाडू शकतो. कुटुंबाचे हे मौन समर्पण आणि माझ्या पाठीशी उभे राहणे, हाच माझ्यासाठी सर्वात मोठा आधार आहे.

**कौटुंबिक संस्कारांपैकी कोणती गोष्ट आजही आपल्या नेतृत्वशैलीत जाणवते ?**

मी आमदाराचा किंवा खासदाराचा मुलगा नाही. नेतृत्व हे वारशातून नव्हे तर; संस्कार, शिक्षण, अभ्यास आणि समाजकार्यातून घडते. आजही मी स्वतःला नेता मानत नाही; मी एक कार्यकर्ता आहे. ज्या दिवशी माणूस स्वतःला नेता समजतो, त्या दिवशी तो राजकारणातून हद्दपार होण्याच्या वाटेवर असतो.

सदैव जनतेत राहणे, जनतेकडून शिकणे आणि त्यांच्या प्रश्नांना समजून घेणे हेच आजच्या राजकारणाचे खरे सूत्र आहे. दरबारी राजकारण, प्रतीक्षा लावणे, दिखाऊ वागणूक हे जनतेला आता नको आहे. गोरगरिबांच्या घरी जाऊन त्यांच्या सोबत बसणे, भाकर खाणे हेच जनतेला भावते. त्यामुळेच घराणेशाही हळूहळू संपत आहे आणि सर्वसामान्य माणूस पुढे येत आहे. माझी कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नाही. वडील साधे शिक्षक होते, सेवा निवृत्तीनंतर सध्या आई आणि वडील पूर्णवेळ शेती करतात, शिक्षण क्षेत्रातील सामान्य आणि शेतकरी असलेल्या कुटुंबातून मी आलो. संघामुळे सामाजिक जीवनाची ओढ लागली. राजकारणात दररोज काहीतरी नवीन शिकायला मिळते. मोदीजी, देवेंद्र फडणवीस, संघातील प्रचारक यांच्याकडून प्रेरणा घेतो. नेतृत्व स्वतः घोषित करायचे नसते; ते समाजाने स्वीकारायचे असते. त्यासाठी समर्पण, त्याग आणि सातत्य आवश्यक असते. समाज, विशेषतः गोरगरीब जनता, ज्या दिवशी तुम्हाला नेतृत्व म्हणून स्वीकारते, त्या दिवशी तुमचे नेतृत्व खऱ्या अर्थाने घडते असे मला वाटते.

**जेव्हा कधी एखादा विसंवाद निर्माण होतो तेव्हा संवादातून संवादाकडे जाण्यासाठी आपण कुठली युक्ती वापरता ?**

संघर्षाच्या वेळी कोणतीही युक्ती वापरण्याची गरज नसते; प्रामाणिकपणा आणि समर्पण पुरेसे असते. पाच वर्षांपूर्वी मे २०२० मध्ये माझी विधान परिषदेची आमदारकी जाहीर झाली होती. पक्षनेतृत्वाने संधी दिली; पण शपथविधीच्या आदल्या दिवशी देवेंद्रजींनी संघटना आणि पक्षहितासाठी निर्णय घ्यावा लागेल, असे सांगितले. मी क्षणाचाही विलंब न करता उमेदवारी मागे घेतली.

तत्पूर्वी गावोगावी आनंदोत्सव, मिरवणुका, आरत्या झाल्या होत्या, म्हणून हा उमेदवारी मागे घेण्याचा निर्णय भावनिकदृष्ट्या कठीण होता. पण आमदारकीपेक्षा पक्षहित, देशहित आणि संघटना मला अधिक महत्त्वाची वाटली. हे मी कुटुंबीयांना, कार्यकर्त्यांना आणि समाजाला स्पष्ट सांगितले. ''पद मागून मिळत


नाही; कामातून मिळते'' हा संस्कार मला घरातून मिळाला आहे.

काही काळ दुःख झाले; पण सर्वांनी ते स्वीकारले. मी कोणतीही अपेक्षा न ठेवता समाजकार्य, कोविड काळातील आरोग्यासह सर्व प्रकारच्या सेवा आणि संघटनात्मक काम सुरू ठेवले. चार वर्षानंतर फेब्रुवारी २०२४ रोजी पक्षाने स्वतःहून मला राज्यसभेची जबाबदारी दिली. त्या निर्णयाने कुटुंब, कार्यकर्ते आणि समाजातील नाराजी दूर झाली. मला वाटते; विसंवादातून समाधानाकडे जाण्याचा मार्ग एकच, तो म्हणजे स्वार्थत्याग, स्पष्ट संवाद आणि अखंड सेवा.

**सोशल मीडियामुळे आजची पिढी संवादातून दूर जातेय का, किंवा अति-संवाद होतोय का ? आजच्या पिढीला आपण काय सल्ला द्याल ?**

सोशल मीडियाचा अतिरेक घातक आहे. मोबाईल, टीव्ही किंवा नव्या तंत्रज्ञानाचा वापर आवश्यक आहे; पण त्याची सवय झाली तर नुकसान होते. आजची पिढी चांगल्या वापराऐवजी दिवसभर रील्स पाहते, अभ्यासाकडे दुर्लक्ष करते. जेवताना, झोपताना मोबाईल यामुळे आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. कमी वयात हार्ट अटॅक, हार्मोनल बिघाड, आयुष्याची गुणवत्ता कमी होणे हे वास्तव आहे. म्हणूनच मी राज्यसभेत १६ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडियावर निर्बंधांची मागणी केली; त्याला कायदेशीर स्वरूप देण्याचा प्रयत्न सुरू आहे.

मानवी मेंदू हा सर्वात मोठा आहे; तो एआयपेक्षा श्रेष्ठ आहे. गंभीर वैद्यकीय प्रसंगी एआय नव्हे, तर डॉक्टरचे डोके कामी येते. म्हणूनच प्रत्येक गोष्टीला मर्यादा हव्यात. मोबाईल तुमचा गुलाम असावा; तुम्ही मोबाइलचे गुलाम नसावे. जेवताना, झोपताना आणि कौटुंबिक वेळेत मोबाईल बाजूला ठेवा. सोशल मीडिया आवश्यक तेव्हाच वापरा; आयुष्य त्यासाठी वाया घालवू नका. स्वतःसाठी, कुटुंबासाठी, आरोग्यासाठी, व्यायामासाठी, वाचन- मननासाठी वेळ द्या. संतुलन ठेवा. ''अति तिथे माती'' हेच सूत्र आहे. विज्ञान आणि सोशल मीडिया चांगले आहेत; पण ते आयुष्य समृद्ध करण्यासाठी, अधोगतीसाठी नव्हेत असे माझे ठाम मत आहे. ❑



# दीर्घायु दृष्टिक्षेप !



**विविध आरोग्य उपक्रमांच्या माध्यमातून आजवर 417 हून अधिक ठिकाणी, आणि सुमारे 30,000 हून अधिक गरजुंपर्यंत सेवा पोहोचवण्यात (विनामूल्य) दीर्घायु सेवा प्रतिष्ठानला यश लाभले आहे.**